**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - IX - SET - I**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 90)** **(Time : 3 Hrs.)**

---

## SECTION - A (READING)

**प्र. १ – खाली दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

अनेक लोक अतिशयोक्तीवर आधारलेल्या विनोदाला नाके मुरडतात. पण हा गैरसमज अज्ञानावर आधारलेला आहे. माझी त्यासंबंधीची भूमिका वेगळी आहे. सत्याचे आकलन केवळ वास्तव दृष्टीनेच त्याच्याकडे पाहून होते असे नव्हे. कधी कधी सत्याकडे अवास्तव किंवा विपर्यस्त दृष्टीने बघावे लागते. म्हणजे त्याच्या मर्यादा समजतात. पुष्कळ माणसे स्वतःचा चेहरा आरशात न्याहाळून पाहताना वेडेवाकडे विक्षेप करीत असतात. ते काय आपल्या चेहऱ्याचे विडंबन करतात ? नाही. पण तसे विक्षेप केल्याखेरीज त्यांना आपल्या चेहऱ्याची यथार्थ कल्पना येत नाही. फुगीर किंवा खोलगट आरशासमोर आपण अगदी शांतपणे आणि गंभीरपणे उभे राहिलो तर आपल्या आकृतीचे भयानक रूप आपल्याला आपल्या डोळ्यांनीच पाहावयास सापडते. तथापि, त्यामुळे आपल्याला आरशाचा तिरस्कार वाटत नाही. किंबहुना तासन् तास त्या आरशासमोर उभे राहून आत्मरंजन करण्याचा मोह आपल्याला अनावर होतो. याचे रहस्य काय आहे? तेच विनोदात अतिशयोक्तीचे महत्त्व आहे. केवळ विनोदातच नव्हे तर सामान्य जीवनातही अतिशयोक्तीला फार मोठे स्थान आहे. कारण त्याखेरीज वास्तवाची आपणास कल्पनाच येऊ शकत नाही. . 'माझ्या सर्वांगाची आग झाली', 'लाथ मारीन तेथे पाणी काढीन', ''माझ्या पोटात कावळे ओरडू लागले आहेत' अशी भाषा आपण सहज बोलतो किंवा ऐकतो. अतिशयोक्ती काय याहून वेगळी असते ?

१) 'चेहरा' या शब्दाचे वचन बदलून लिहा. १
'डोळे' या शब्दाचे लिंग ओळखा व लिहा.

२) माणसाला आरशात पाहण्याचा मोह का होतो ? ४

३) वरील उताऱ्यात कोणते वाक्प्रचार आले आहेत, ते लिहा. ३

**प्र. २ – पुढील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा :**

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात. हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याशा फांदीवर वाऱ्याच्या लहरींनी डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि जाणाऱ्या–येणाऱ्याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाहीत. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखेच सुंदर करू शकतो. या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्वकालापुरता का होईना; पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. तसे करण्यातच या जीवनाचे काही सार्थक आहे. या जीवनाचा प्रवास करीत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास वावरत धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले पुढे चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळ्या कोटींतील माणसे आपल्याला भेटतात. त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात. आणखी कोणाच्या विचारांमधून अंतःकरणाला काही दिलासा मिळतो आणि असामान्य विभूतींनी दाखवून दिलेल्या मार्गाच्या अल्पशा अनुसरणातून आपले जीवन उन्नत होते. या

साऱ्या व्यक्तींविषयी कृतज्ञतेचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते. त्यांचे स्मरण जागवणे हा त्यांच्या ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्याचा एक मार्ग आहे.

१) 'टपोरे' या शब्दाची जात ओळखा. १

'क्षण' या शब्दाचे अनेकवचन लिहा.

२) थोरांविषयी कृतज्ञता का दाखवायची ? ३

३) बागेतील फूल कोणती प्रेरणा देते ? ३

**SECTION - B (COMPOSITION)**

**प्र. ३ –** अ) तुमच्या शाळेत आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्धेची माहिती तुमच्या मित्राला पत्राने कळवा. **१०**

ब) तुमच्या विज्ञानाची प्रयोगवही हरविली आहे. त्याबद्दल शाळेच्या सूचनाफलकावर लावण्यासाठी सूचना तयार करा. **५**

**SECTION - C (GRAMMAR)**

**प्र. ४ –** १) 'भाजीभाकरी' हा कोणता समास आहे ? ५

अ) कर्मधारय ब) समाहार द्वंद्व क) मध्यमपदलोपी ड) द्विगू

२) 'कांदेपोहे' हा कोणता समास आहे ?

अ) तत्पुरुष ब) बहुव्रीही क) मध्यमपदलोपी ड) इतरेतर द्वंद्व

३) 'नवरात्र' हा कोणता समास आहे ?

अ) द्विगू ब) विभक्ती बहुव्रीही क) कर्मधारय ड) अव्ययीभाव

४) 'पापपुण्य' या शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.

५) 'सप्तर्षी' या शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.

**प्र. ५ –** १) 'कृत्रिम' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा. **५**

अ) खोटे ब) नैसर्गिक क) खरे ड) अनैसर्गिक

२) 'चिमुकला' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

१) भव्य २) लहान नसलेला क) मोठा ड) लहान

३) 'आत' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

अ) बाहेर ब) अंतर्गत क) बाह्य ड) अंतर्बाह्य

४) 'पूर्ण' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ) संपूर्ण ब) अपूर्ण क) अपुरे ड) पूर्ण नसलेले

५) 'शत्रू' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) मित्र २) रिपू क) सखा ड) सन्मित्र

**प्र. ६ – खाली दिलेल्या शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा : (कोणतेही ५)** ५

१) पायापासून डोक्यापर्यंत

२) पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे

३) कविता रचणारी स्त्री

४) देशासाठी प्राण अर्पण केलेले

५) स्वतःशी केलेले भाषण

६) एकमेकांवर अवलंबून असणारे

**प्र. ७ – खालील वाक्ये शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करून पुन्हा लिहा : (कोणतेही पाच)** **५**

१) श्यामचे वडिल शाळेसमोर उभे होते.
२) नियमीत अभ्यास विद्यार्थिजीवनाचा पाया आहे.
३) आम्ही वेरूळची लेणि पाहायला गेलो.
४) तो नोकरि करून शिकतो.
५) आजीने सगळ्यांना गोष्ट सांगीतली.
६) राजाने शीपायाला बोलावले.

**SECTION - D (LITERATURE)**

**प्र. ८ – अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :** **५**

मी घनपाठी आहे, जटापाठी आहे असे घरोघर सांगत फिरून पैसे मागणाऱ्या भिक्षुकाप्रमाणे मी कधी करणार नाही.

**किंवा**

आकाशातून धारा बरसण्याऐवजी लोकांच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या.

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे सुमारे १० ते १२ ओळींत लिहा :** **१०**

१) बादशहाने सेनापती संताजींचा कशाप्रकारे काटा काढला ?
२) गणिताचे शिक्षक म्हणून लोकमान्य टिळकांची कोणती वैशिष्ट्ये 'लोकमान्य टिळकांच्या आठवणी' या पाठातून दिसतात ?
३) कृष्णाच्या घरी अधूनमधून उपासमारीची वेळ का येत असे ?

**प्र. ९ – अ) खालीलपैकी कोणत्याही एका कडव्याचे संदर्भासह आशयसौंदर्य स्पष्ट करा :** **५**

'जीवनात गाणं असेल तरच
जीवन रानझऱ्यासारखं
खळाळत जाईल
आणि गाणं नसेल तर
जीवन खडका दगडांतून
ठेचकाळत राहील.'

किंवा

'झाडं दिलेलं वचन मोडत नाहीत
आजन्म राहतात एकनिष्ठ मुळाशी'

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची १० ते १२ ओळींत उत्तरे लिहा :** **१०**

१) गाण्याकडे कवी कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो ?
२) कवीने दुष्काळासंबंधी कोणती भावना व्यक्त केली आहे ?
३) जुन्या घराच्या गळ्यात आवंढा का आला ?

**प्र. १० – अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे १२ ते १५ ओळींत उत्तर लिहा :** **६**

बुधाचे स्वभावचित्र रेखाटा.

**किंवा**

बन्याबापूंचा इनामदारी खाक्या लेखकाने कसा व्यक्त केला आहे ?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** **४**

१) बन्याबापूंच्या घरी कोण-कोण राहत असे ?
२) बुधाचे वडील मुंबईत राहायला का आले ?

**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - IX - SET - II**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 90)** **(Time : 3 Hrs.)**

---

## SECTION - A (READING)

**प्र. १ – अ) पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

''जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात'', असे पसायदान मागणाऱ्या ज्ञानमूर्ती ज्ञानेश्वर महाराजांचे वंशज आम्ही, पाश्चात्य संस्कृतीचे गोडवे गाण्यात धन्यता मानतो; परंतु आमच्या संस्कृतीची सर्वश्रेष्ठता पसायदानाच्या वरील एकाच ओळीवरून प्रत्ययास येते. आम्ही आमची संस्कृती काही तलवारीच्या धारेवर टिकवून ठेवलेली नाही, हे सर्वांनी ध्यानात घ्यावे. ज्या ज्या ठिकाणचे जे जे चांगले मिळेल ते ते स्वीकारावे व वाईट असलेले खुल्या दिलाने दूर सारावे, हेच आम्हाला शिकवले गेले. आमची संस्कृती ही सर्वसमावेशक आहे. स्वानुभाव विश्वास ठेव. त्याप्रमाणे योग्य असे आचरण कर, हेच आमची संस्कृती सांगते. भारतीय संस्कृतीचे महत्त्व आज जगाला पटायला लागले आहे. जगातील मोठमोठ्या संशोधकांच्या–शास्त्रज्ञांच्या–तत्वचिंतकांच्या टेबलांवर आज आपल्याला वेद, उपनिषद व अन्य भारतीय ग्रंथ आढळून येतील. तेव्हा आज आपण पाश्चात्यांचे अंधानुकरण न करता भारतीय संस्कृती समजावून घेतली तरी आपले जीवन उजळून निघेल.

**प्रश्न :**

१) आमची संस्कृती सर्वसमावेशक आहे. (या वाक्यातील सर्वनाम ओळखा.) १

२) 'भारतीय संस्कृती सर्वसमावेशक आहे' असे लेखक का म्हणतो ? ४

३) 'आपले जीवन उजळून निघेल' असे लेखकाने कां म्हटले आहे ? ३

**ब) पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

लोकशाही म्हणजे काही सहज स्थिती नव्हे, हे ध्येय आहे; आणि हे ध्येय प्रयत्नाने आणि शिक्षणानेच साध्य करावयाचे आहे. राजकीयदृष्ट्या लोकशाही आज तितकीशी यशस्वी नाही. याचे मुख्य कारण मतदार आपले मत विचारपूर्वक व प्रामाणिकपणे देत नाहीत हे आहे. मतदारांची बुद्धी वाढली पाहिजे व पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा वाढला पाहिजे. असे झाले तरच लोकशाही अधिक यशस्वी होईल. ध्येयभूत पूर्णतेच्या दृष्टीने आजची लोकशाही जरी हिणकस ठरली तरी ती भूतकालीन राज्यपद्धतीपेक्षा बरी आहे. अर्थात काही अनियंत्रित राजे असेही झाले की, जे अति उदार होते. त्यांच्या कीरकीर्दीत लोकांना सुख व शांती यांचा लाभ झाला. परंतु ते अपवाद सोडून दिलेले बरे. लोकशाहीत सार्वजनिक सुख, शांती व सुस्थिती अधिक राहते.

**प्रश्न :**

१) हे ध्येय प्रयत्नाने आणि शिक्षणानेच साध्य करावयाचे आहे. १

(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

२) लोकशाही केव्हा अधिक यशस्वी होईल ? ३

३) 'भूतकालीन पद्धतीपेक्षा लोकशाही बरी' असे लेखकाने कां म्हटले आहे ते तुमच्या शब्दात सोदाहरण सांगा. ३

**SECTION - B (COMPOSITION)**

**प्र. २ –** अ) आपल्या लहान भावाला/बहिणीला व्यायामाचे महत्त्व पटवून देणारे पत्र लिहा. १०

**किंवा**

ब) राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करणाऱ्या तुमच्या मित्राचे पत्राद्वारे अभिनंदन करा.

**प्र. ३ – सूचना फलक लिहा :** **५**

'तुमची विज्ञानाची वही शाळेतून हरवली आहे. त्याबद्दल शाळेच्या सूचना फलकावर सूचना लिहा.'

**SECTION - C (GRAMMAR)**

**प्र. ४ –** १) पुढील शब्दाचा सामासिक शब्द तयार करा : **५**

पुरण घालून केलेली पोळी

२) पुढील शब्दाचा समास विग्रह करा :

राजवाडा

३) 'खरेखोटे' हा कोणता समास आहे ?

अ) द्विगू ब) समाहार द्वंद्व क) वैकल्पिक द्वंद्व ड) कर्मधारय

४) 'त्रिभुवन' हा कोणता समास आहे ?

अ) इतरेतर द्वंद्व ब) द्विगू क) कर्मधारय ड) मध्यमपदलोपी

५) 'भाजीपाला' हा कोणता समास आहे ?

अ) मध्यमपदलोपी ब) कर्मधारय क) द्विगू ड) समाहार द्वंद्व

**प्र. ५ –** १) खालील शब्दाचा विरोधी अर्थाचा शब्द लिहा : **५**

प्रिय  ...............

२) खालील शब्दाचा विरोधी अर्थाचा शब्द लिहा :

जन्म  ...............

३) 'दुष्काळ' ह्या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

अ) सुकाळ ब) सायंकाळ क) सकाळ ड) भूतकाळ

४) 'पराक्रमी' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा :

अ) धाडसी ब) क्रूर क) भित्रा ड) आक्रमक

५) 'प्रचंड' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा :

अ) आनंद ब) मोठा क) चढण क) चिमुकले

**प्र. ६ – अनेक शब्दांसाठी असलेला 'एक शब्द' लिहा : (कोणतेही पाच)** **५**

१) शेतात काम करून शेती पिकविणारा

२) देशाचे प्रमुख मंत्रीपद भुषविणारा

३) मातीची भांडी बनविणारा

४) बैल जुंपून केलेली गाडी

५) रानात गुरे राखणारा

६) न्यायालयात न्याय देणारे

**प्र. ७ – खालील वाक्यातील शुद्धलेखनाच्या चुका ओळखून वाक्य शुद्ध करा : (कोणतेही पाच)** **५**

१) बागेथ गर्दि वाढत आहे.

२) ठंड वारे वाहु लागले.

३) आजि प्रारथना करू लागली.

४) मला शायेत जायला आवढते.

५) सकाळी मूलांचि पंगत बसलि.

६) मोहनला त्याचे मीत्र मुरख समजू लागले.

७) तिच्या डोल्यात आश्रू उबे राहिले.

**SECTION - D (LITERATURE)**

**प्र. ८ – अ) खालीलपैकी कोणत्याही एका अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :** **५**

१) गणिताच्या योगाने विचारांची साखळी अत्रुटित व सुसंबद्ध होते.

२) त्याच्या डोळ्यातून आसवांचा पूर वाहू लागला आणि मनात वाघ्याच्या स्मृती येत राहिल्या.

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **१०**

१) बादशहाने सेनापती संताजीचा कशाप्रकारे काटा काढला ?

२) वाघ्याला विकायचा निर्णय का घ्यावा लागला ?

३) स्कॉलरशिपबद्दल लोकमान्य टिळकांनी कोणते मत मांडले ?

**प्र. ९ – अ) खालीलपैकी कोणत्याही एका पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण करून वैशिष्ट्ये लिहा :** **५**

१) 'जुने घर मला जाताना पाहत राहिले
गळ्यातला आवंढा गळ्याशी सांभाळीत'

२) 'झाडं दिलेलं वचन मोडत नाहीत
आजन्म राहतात एकनिष्ठ मुळाशी.'

**ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **१०**

१) गाण्याचे महत्त्व कवीने कोणत्या शब्दांत सांगितले आहे ?

२) कवीने दुष्काळासंबंधी कोणती भावना व्यक्त केली आहे ?

३) 'जुने घर' या कवितेतील स्त्रीला बदलत्या काळानुसार कोणती तडजोड करावी लागली ?

**प्र. १० – अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दहा–बारा ओळींत लिहा :** **६**

१) बन्याबापूंचा इनामदारी खाक्या कोणकोणत्या गोष्टींतून व्यक्त होतो ?

२) बुधाचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**ब) खालील प्रश्नांचे उत्तर लिहा : (कोणतेही एक)** **४**

१) निवृत्त झाल्यावर बुधाने माचीला जाण्याचा निर्णय का घेतला ?

२) बन्याबापू गावातल्या लोकांशी कसे वागत ?

**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - X - SET - I**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 80)** **(Time : 3 Hrs.)**

## SECTION - A (GRAMMAR)

**प्र. १ – पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा : (कोणतेही पाच)** ५

१) गेल्या वर्षी तू चांगला अभ्यास केलास. (वर्तमानकाळ करा.)

२) शिक्षिका वर्गात मराठी शिकवत होत्या. (वर्तमानकाळ करा.)

३) मला भारतदर्शन करण्याची इच्छा आहे. (भूतकाळ करा.)

४) उद्या तू मला भेटशील. (भूतकाळ करा.)

५) मी गावाला जातो. (भविष्यकाळ करा.)

६) काल वर्तमानपत्रात ही बातमी आली. (भविष्यकाळ करा.)

## SECTION - B (COMPOSITION)

**प्र. २ –** रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलिस खात्याकडे एक तक्रार नोंदवा.

**किंवा**

तुम्ही खरेदी केलेला दूरदर्शन संचात (T.V.) बिघाड असल्याने तो बदलून देण्याविषयी दुकानदारास पत्र लिहा. ८

**प्र. ३ – पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा :** ७

तो रविवारचा दिवस होता. बहुदा सकाळचे आठ वाजले असावे. जाग आलेली होती पण; उगाचच सुटीचा दिवस म्हणून मी अंथरुणात लोळत पडलेला होतो. अचानक फोनची बेल वाजली मग मात्र मला उठावेच लागले. तातडीने उठून मी फोन घेतला. संदीपचा फोन होता. संदीप माझा जीवलग मित्र. पण त्याचा घाबरलेला आवाज ऐकून मी कमालीचा बेचैन झालो. कारण राजेशला अपघात झाला हे ऐकून तर मी सुन्न झालो. राजेश, मी आणि संदीप आम्ही बालमित्र पण अजूनही आमची मैत्री टिकलेली होती. राजेशला 'शतायु' दवाखान्यात भरती केले होते. मी तातडीने अंगावर कपडे चढविले. गाडीची किल्ली घेतली. कपाटातून एक हजाराचे बंडल मी खिशात कोंबले आणि झपझप पावले टाकत मी गाडीजवळ पोहचलो. क्षणात गाडी भरधाव चालवू लागलो. अवघ्या पाच किलोमीटरचा रस्ता पण त्यावेळी तो लांबच लांब वाटू लागला. रस्त्यावरची गर्दी रोजपेक्षा जास्तच वाटू लागली. कसाबसा दवाखान्याजवळ पोहचलो. समोरच उभा असलेला संदीप मला स्पष्ट दिसत नव्हता कारण माझे डोळे पाण्याने डबडबले होते.

**प्र. ४ – पुढील मुद्यांवरून गोष्ट लिहा :** १०

एका नगरात एका साधूजवळ एक माणूस येतो –––– साधूने त्याला उपदेश केला –––– प्रत्येक प्राण्यात व मनुष्यात परमेश्वर असतो –––– तो माणूस रस्त्यावरून जातांना त्याला एक हत्ती दिसला –––– हत्ती सैरावैरा पळत होता –––– हत्तीवरील माहूत मोठमोठ्याने ओरडत होता –––– पळा, पळा हत्ती माजलेला आहे –––– मनुष्य हत्तीत परमेश्वर आहे म्हणून त्याच्या समोर जातो –––– दूर फेकला जातो –––– साधूला जाऊन सांगतो. हत्तीत परमेश्वर नव्हता –––– साधूचा उपदेश माणसाला –––– माहूतातला परमेश्वर तुला ओरडून सांगत होता तो तुला दिसला नाही –––– तात्पर्य.

## SECTION - C (COMPREHENSION)

**प्र. ५ – पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

मित्रांनो, भूकंपाच्या बातम्या ऐकून आणि वाचून तुम्ही इथे धावलात. पण भूकंपाचा अनुभव मला अजूनही घाबरवतो आहे. ३० सप्टेंबरला अनंत चतुर्दशी होती. गणेश विसर्जनाची थाटामाटाने गावात मिरवणूक निघाली. नदीवर गणेश विसर्जन करून आम्ही घरी परतलो. थकूनभागून सारे गाव झोपले. मिरवणुकीच्या ढोल–ताशाचे नि 'गणपतीबाप्पा मोरया' या घोषाचे आवाज कानात घट्ट बसले होते... आणि त्याच पहाटे जमिनीतून गडगडाटाचा मोठा आवाज आला. जमीन गदागदा हालली. धडाधड घरे कोसळली. धुळीचे लोट पहाटेच्या काळोखात मिसळले. किंकाळ्यांनी सारे गाव भरून गेले. सर्वत्र रडारड नि कव्हणे.... खिलारी गाव सुन्न झाले.

सूर्याची किरणे पसरली आणि भूकंपाने गावाची कशी दैना केली, हे समजू लागले. मी आमच्या घराच्या पडलेल्या तुळईखाली अलगद राहिलो होतो. बाजूच्या दगडमातीच्या भिंतीखाली बाबा, आजोबा, आजी पार गाडले गेले. आई लोखंडी कॉटखाली पडली म्हणून कशीबशी वाचली. घरातील चार माणसांचे मुडदे पाहून तिची शुद्ध हरपली. अजूनही तिची स्थिती वेड्यासारखीच आहे. गावातील सर्व घरे कोसळली. प्रत्येक घरात एखादेच माणूस वाचले.

पण याही आपत्तीत चोऱ्या करणारे, खोटे नुकसान दाखवून मदतीचे पैसे लाटणारे समाजकंटक पाहिले, की शरम वाटते, भूकंपाच्या या संकटात आम्ही जे दुःख भोगतोय याची तुलना नाही. ही संतांची भूमी आहे. दुःखावर मात करणे हाच खरा पुरुषार्थ ! अशी त्यांची शिकवण आहे.

**अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरांपैकी योग्य पर्याय निवडा :** **४**

१) अनंत चतुर्दशी केव्हा होती ?

अ) ३० नोव्हेंबर ब) ३ सप्टेंबर

क) ३० सप्टेंबर ड) २० ऑक्टोंबर

२) कोणते गाव सुन्न झाले ?

अ) खिलारी ब) खिरगाव

क) आमगाव ड) रामपूर

**ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** **६**

१) पहाटेच्या भूकंपाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

२) आईची स्थिती अजूनही वेड्यासारखी का आहे ?

## SECTION - D (LITERATURE)

**प्र. ६ – पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :** **१५**

१) 'भास्करबुवा' होण्यासाठी भास्करला कोणते परिश्रम घ्यावे लागले ?

२) आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती ?

३) ज्योत्सना कदम यांच्या घरात कोणत्या अडचणी होत्या ?

४) प्लेगच्या साथीत सावित्रीबाई फुले यांनी कोणते कार्य केले ?

**प्र. ७ – अ) इवल्याशा पणतीने कोण पांगळा होतो ?** **२**

१) माणूस २) काळोख ३) अंकूर ४) प्रकाश

**ब) पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :** **३**

१) 'संघर्ष' या कवितेत श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?

२) 'तहान' या कवितेत आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी कवी स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?

**क) पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचा संदर्भ सांगून त्यातील अर्थसौंदर्य स्पष्ट करा :** **१०**

१) 'जरी पेरती अंधार फुटू नये त्या अंकूर
हातातल्या ज्योतीसाठी नको कुणाची फुंकर

२) 'पक्की ठेव खूणगाठ
तुझी असू दे मान ताठ'

३) 'तुकोबा जोतीबा मनोभावे स्मरू
संघर्ष उभारू श्रमिकांचा'

**प्र. ८ –** अ) गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ? तो कसा फसला ? **६**

ब) 'या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या कुटुंबीय आहेत' असे प्रीतम का म्हणाला ? **४**

**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - X - SET - IV**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 80)** **(Time : 3 Hrs.)**

---

## SECTION - A (GRAMMAR)

**प्र. १ – पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलवून ती वाक्ये लिहा : (कोणतीही पाच)** ५

१) शिक्षकांनी धडा शिकवला. (वर्तमानकाळ करा.)

२) तो खूप काम करत होता. (वर्तमानकाळ करा.)

३) राघव अभ्यास करतो. (भूतकाळ करा.)

४) पैसा मिळविण्यासाठी बरेच कष्ट करावे लागतात. (भूतकाळ करा.)

५) सुजन क्रिकेट खेळत होता. (भविष्यकाळ करा.)

६) शिक्षक धडा शिकवतात. (भविष्यकाळ करा.)

## SECTION - B (COMPOSITION)

**प्र. २ –** जवळचा साखर कारखाना पाहण्याची अनुमती मागणारे पत्र कारखान्याच्या व्यवस्थापकास लिहा. ८

**किंवा**

नुकताच खरेदी केलेला मोबाईल सेट व्यवस्थित चालत नसल्याची तक्रार करणारे पत्र दुकानदाराला लिहा.

**प्र. ३ – पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा :** ७

अगदी पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई ! 'मातृदेवो भव !' जन्मताच मुलाला आईशिवाय दुसरे कोण दिसते ? वत्सलतेच्या रूपाने ती परमेश्वराचीच मूर्ती तेथे उभी असते. ह्या मातेची व्याप्ती आपण वाढवू व 'वंदे मातरम्' म्हणून राष्ट्रमातेची व पुढे भूमातेची, पृथ्वीची पूजा करू. परंतु आरंभी उंच उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. म्हातारपणी आपल्या उपयोगी पडेल असा हिशेब करून का ती आपल्या मुलाची सेवा करत असते ? छे छे ! तिने त्या मुलाला जन्म दिला. तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला त्या मुलाचे वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाही. ती माऊली म्हणजे निःस्सीम सेवेची मूर्ती. उत्कृष्टातील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला आई या नावानेच हाक मारावयाची. आई ह्या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठे ? आई हे पहिले ठळक अक्षर. तेथे ईश्वर पाहावयास शिका.

**प्र. ४ – पुढील मुद्यांवरून गोष्ट लिहा :** १०

एक व्यापारी --- अंगठी चोरीस जाणे --- नोकरांवर संशय --- प्रकरण कोर्टात जाणे --- न्यायाधीशाची युक्ती --- समान उंचीच्या काठ्या देणे --- अंगठी चोरीची काठी दोन इंच वाढेल --- दुसऱ्या दिवशी सर्वांच्या काठ्या बघणे --- एकाची काठी दोन इंच लहान --- चोर पकडणे --- अंगठी परत मिळणे --- तात्पर्य.

## SECTION - C (COMPREHENSION)

**प्र. ५ – पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

वर्तमानपत्र हे जसे जिज्ञासा भागवते तसेच ते ती वाढवतेही. मतप्रसाराचे आणि ज्ञानदानाचे अमोघ साधन म्हणून वर्तमानपत्राची जी महती गातात ती याच कारणामुळे. ज्ञानदानाच्या साधनात वर्तमानपत्राप्रमाणेच ग्रंथाचीही गणना आहे, पण हा ग्रंथ सुशिक्षित व्यक्तीच्या हातीच बहुधा पडतो; उलट वर्तमानपत्राचा प्रसार सर्व दर्जाच्या लोकांत असल्यामुळे त्यातले ज्ञान समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत झिरपत जाते. शिवाय ग्रंथ हा जसा विचारांच्या तसाच किमतीच्या दृष्टीनेही बहुमोल असल्यामुळे सामान्य माणसाला तो वाचणे, तसेच विकत घेणेही बहुधा अशक्य असते. उलट वर्तमानपत्राची किंमत थोडी, त्यात समाविष्ट झालेल्या ज्ञानाला साजेल इतकीच असते; त्यामुळे वर्तमानपत्र वाचण्याची तलफ भागणे जड जात नाही. अर्थात ग्रंथापेक्षा वर्तमानपत्राचा प्रसार शतपट अधिक असतो, पण ज्ञानदानाच्या दृष्टीने जरी वर्तमानपत्राची उपयुक्तता अधिक वाटली तरी त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात त्याचा दर्जा ग्रंथाहून अधिक ठरत नाही. कार्लाईलने वर्तमानपत्री वाङ्मयाला 'गुडघाभर पाणी' म्हटले आहे, ते खोटे नव्हे.

**अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरांपैकी योग्य पर्याय निवडा :** **४**

१) वृत्तपत्री वाङ्मयाला गुडघाभर पाण्याची उपमा कोणी दिली आहे ?

अ) ॲरिस्टॉटलने ब) प्र.के. अत्रेंनी क) कार्लाईलने ड) शेक्सपियरने

२) वर्तमानपत्र माणसाची काय भागवते ?

अ) भूक ब) जिज्ञासा क) तहान ड) अमोघ

**ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** **६**

१) वर्तमानपत्राची महती कोणत्या शब्दात गायली जाते ? का ?

२) ज्ञानप्रसाराच्या कार्यात ग्रंथापेक्षा वर्तमानपत्रे अधिक उपयुक्त कशी ठरतात ?

## SECTION - D (LITERATURE)

**प्र. ६ – पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :** **१५**

१) लहानपणी गुलजार आणि त्यांचे मित्र कोणकोणते खेळ खेळत ?

२) खाँसाहेबांनी भास्करची परीक्षा कोणत्या पद्धतीने घेतली ?

३) ज्योत्स्ना कदम यांच्या घरासभोवारच्या बागेचे वर्णन करा.

४) प्लेगच्या साथीत सावित्रीबाई फुले यांनी कोणते कार्य केले ?

**प्र. ७ – अ) मनामनात कशाचा सुवास असावा असे कवीला वाटते ?** **२**

१) अंधाराचा २) श्रेयाचा क) दुःखाचा ड) प्रेमाचा

**ब) पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :** **३**

१) आत्मसन्मानाने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे ? हे 'कसं चालेल' ? कवितेद्वारे स्पष्ट करा.

२) तहान कवितेत इच्छा पूर्ण होण्यासाठी कवी स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?

**क) पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचा संदर्भ सांगून त्यातील अर्थसौंदर्य स्पष्ट करा :** **१०**

१) 'ज्योत ज्योतीने जागवा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा'

२) 'व्हावे एव्हढे लहान सारी मने कळो यावी;
असा लाभावा जिव्हाळा पाषाणाची फुले व्हावी.'

३) 'न्याय, नीतीसाठी
शस्त्र व्हावे वाणी
साखरपेरणी, न ये कामा.'

**प्र. ८ –** अ) प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ? **४**

ब) वेळच्या वेळी हप्ते भरूनसुद्धा गणपा कर्जाच्या विळख्यात कसा अडकला ? **६**

**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - X - SET - III**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 80)** **(Time : 3 Hrs.)**

---

## SECTION - A (GRAMMAR)

**प्र. १ – पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा : (कोणतेही पाच)** **५**

१) दिवसभराच्या कामाने रामू थकला. (वर्तमानकाळ करा.)

२) गावातील स्त्रिया भल्या पहाटे उठतात. (भविष्यकाळ करा.)

३) तो एक सामान्य शेतकरी आहे. (भूतकाळ करा.)

४) मी रोज गणिताचा अभ्यास करेल. (वर्तमानकाळ करा.)

५) गावातील सूर्यास्त अप्रतिम आहे. (भविष्यकाळ करा.)

६) तो दररोज घरी उशीरा जाईल. (भूतकाळ करा.)

## SECTION - B (COMPOSITION)

**प्र. २ –** तुम्ही काढलेले विमानाचे तिकीट बदलून घ्यायचे आहे, त्यासाठी प्रवासी एजन्टला पत्र लिहा. ८

**किंवा**

तुम्ही तयार केलेल्या साबणांच्या व्यवसायासाठी, साबणांच्या वितरणाकरिता दुकानदाराला पत्र लिहा.

**प्र. ३ – पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा :** **७**

वेळ ही फार मौल्यवान गोष्ट आहे. म्हणूनच वेळेचा उपयोग समजूतदारपणे केला पाहिजे. वेळेचा वेग किती हे कोणालाच सांगता येणार नाही. पण जो वेळेचे भान ठेवतो, त्याला वेळेबरोबर निश्चितच जाता येते. वेळेचे महत्त्व जाणून जो कामाचे नियोजन करतो त्याला दैनंदिन कामाव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टींसाठी भरपूर वेळ देता येतो. वेळेचे महत्त्व जाणणारी माणसे आपल्या छंदाची मनापासून पूर्तता करू शकतात. दिवसभर कामाच्या व्यापातून घरी आलेली व्यक्ती दीड–दोन तास ग्रंथालयात घालवू शकते. 'वेळ नाही' ही सबब केवळ आळशी माणसेच देतात त्यांच्याजवळ कामाचे आयोजन व नियोजन नसते त्यामुळे कामही वेळेवर होत नाही आणि याचा परिणाम म्हणजे अशी माणसे अपयशाचे धनी होतात.

**प्र. ४ – पुढील मुद्यांवरून गोष्ट लिहा :** **१०**

एक मोठे सरोवर ---- सारे जलचर आनंदाने राहतात ---- एका मोठ्या माशाचे नव्याने आगमन ---- रोज छोटे छोटे मासे खाणे ---- एक दिवस सर्व माशांचे एकजुटीने मोठ्या माशावर तुटून पडणे ---- मोठ्या माशांची गयावया ---- लहानांची एकी ---- अन्यायाला प्रतिकार ---- तात्पर्य.

## SECTION - C (COMPREHENSION)

**प्र. ५ – पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

एखाद्याच्या मृत्यूनंतर माणसे थोडा वेळ शोक करतात व पुढे आपल्या कामाला लागतात. सदैव सुतक कोणी धरत नाही व धरणे युक्त नाही. एखादा मनुष्य मेला म्हणजे त्याच्या घरात केवळ हाहाकार उडतो ! त्याच्या कुटुंबाचे पुढे कसे होणार याची क्षणभर काळजी वाटते, पण हा दुःखाचा आवेग ओसरला म्हणजे त्या घरातील सर्व व्यक्तींची दैनंदिन कामे सुरळीत चालू लागतात. इतके की एक–दोन आठवड्यांत मृत व्यक्तीला पार विसरून जाऊन सर्वांचे खाणे–पिणे–हसणे–खिदळणे पूर्ववत चालू राहते.

दुःखावर काळ हेच एकमात्र औषध आहे. कालांतराने दुःख विसरले जाते. टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री यांच्यासारख्या राष्ट्रपुरुषांच्या मृत्यूनंतरचे पहिले दोन–चार दिवस आठवून पहा. आपल्या देशाचे पुढे कसे होणार याची काळजी लागून राहिली होती, पण थोड्याच दिवसांत हे सारे विसरून राष्ट्रातील सर्वच व्यक्ती पुढील कामाला लागल्याच ना ! मृत्यू कोणालाही टळलेला नाही. तो आज ना उद्या येणारच. मी मेलो म्हणजे पुढे काय होईल, याची काळजी प्रत्येकाला असते. पण मृत्यूनंतर काही दिवसातच लोक आपल्याला विसरतात, हे कटू सत्य नाकारता येत नाही. प्रत्येकाने आपले कर्म, कर्तव्य नियमित व चोख बजावले तर समाधानाने मृत्यू स्विकारणे सहज शक्य होईल, हे खरेच !

**अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरांपैकी योग्य पर्याय निवडा :** **४**

१) दुःखावरील रामबाण उपाय कोणता ?

अ) शोक ब) काळजी

क) काळ ड) मृत्यू

२) समाधानाने मृत्यू स्विकारणे केव्हा शक्य होईल ?

अ) आपले कर्म, कर्तव्य चोख बजावले तर ब) सतत दुःखी राहू लागलो तर

क) सतत हसत–खिदळत राहिलो तर ड) सतत काळजी करत राहिलो तर

**ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** **६**

१) मृत्यूच्या दुःखाचा आवेग ओसरल्यावर काय होते ?

२) थोर राष्ट्रपुरुषांच्या मृत्यूनंतर कोणते चित्र दिसून येते ?

## SECTION - D (LITERATURE)

**प्र. ६ – पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :** **१५**

१) प्लेगच्या साथीत सावित्रीबाई फुले यांनी कोणते कार्य केले ?

२) घराकडे पाहून ज्योत्स्ना कदम यांना उदास का वाटू लागले ?

३) मनुष्य हा देखील एक झाडच आहे, असे लेखकाला का वाटते ?

४) आडाच्या दिशेने चालू लागल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले ?

**प्र. ७ – अ) कशाचा सोहळा साजरा करावा असे कवीला वाटते ?** **२**

१) माणसांचा ब) प्रकाशाचा क) अंधाराचा ड) प्रेमाचा

**ब) पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :** **३**

१) श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?

२) कवीच्या कोणकोणत्या उदात्त इच्छा 'तहान' या कवितेतून व्यक्त होताना दिसतात ?

**क) पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचा संदर्भ सांगून त्यातील अर्थसौंदर्य स्पष्ट करा :** **१०**

१) 'ज्योत ज्योतीने जागवा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा'

२) 'पक्की ठेव खूणगाठ
तुझी असू दे मान ताठ'

३) 'सर्व काही देता यावे, श्रेय राहू नये हाती'

**प्र. ८ –** अ) 'या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या कुटुंबीय आहेत' असे प्रीतम का म्हणाला ? **६**

ब) वेळच्या वेळी हप्ते भरूनसुद्धा गणपा कर्जाच्या विळख्यात कसा अडकला ? **४**

**MARATHI (CODE NO. 009)**

**SUMMATIVE ASSESSMENT - II**

**CLASS - X - SET - II**

**SECOND TERM (OCTOBER 2011 - MARCH 2012)**

**SAMPLE QUESTION PAPER**

**(M.M. : 80)** **(Time : 3 Hrs.)**

---

## SECTION - A (GRAMMAR)

**प्र. १ – पुढील वाक्यांचा काळ कंसातील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा : (कोणतेही पाच)** ५

१) मनोज घरी जात असेल. (वर्तमानकाळ करा)

२) दादा कचेरीला गेले. (भविष्यकाळ करा)

३) मला उद्या गावाला जायचे आहे. (भूतकाळ करा)

४) तो पुस्तक वाचतो. (भविष्यकाळ करा)

५) विकास नेहमी शांत असतो. (भूतकाळ करा)

६) नंदू उद्या येणार आहे. (काळ ओळखा)

## SECTION - B (COMPOSITION)

**प्र. २ –** तुमच्या परिसरात विद्युत पुरवठा वारंवार विस्कळीत होतो तक्रार करणारे पत्र विद्युत मंडळाच्या मुख्य अभियंत्यास लिहा. ८

**किंवा**

शाळेतील वाचनालयासाठी काही पुस्तकांची आवश्यकता आहे. मागणी करणारे पत्र व्यवस्थापक, संकेत पुस्तकालय, पुणे २ या पत्यावर लिहा.

**प्र. ३ – खालील उताऱ्याचे एक तृतीयांश सारांश लेखन करा :** ७

निसर्गाचा प्रकोप झाल्याच्या अनेक बातम्या आपण ऐकतो व वाचतो. धरणीकंप, ज्वालामुखी, प्रचंड वादळ, अतिवृष्टीमुळे होणारेजलप्रलय, निसर्गकोपाचे हे काही ठळक प्रकार आहेत. असा कोणत्याही प्रकारचा प्रकोप झाला की, फार मोठा विध्वंस होतो. हजारो लोक प्राणाला मुकतात. लाखो लोकांचे जीवन उध्वस्त होते. मोठमोठ्या शहरांची वाताहत होते पण खरोखरी मानव इतका दुबळा आहे का ? तसा तो दुबळा असता तर त्याने विविध क्षेत्रात जो विजय मिळवला तो कसा मिळवला असता ? श्रमाने, प्रेमाने, बुद्धिचातुर्याने मानवाने निसर्गाला जिंकले. जमिनीतून विविध पिके काढली. जमिनीच्या व समुद्राच्या पोटातील संपत्ती शोधून काढली. विज्ञानाच्या जोरावर नगरे वसवली. तेनसिंग हिमालयावर चढून एव्हरेस्ट शिखरावर पोहोचला तर नील चंद्रावर उतरला मग मानव दुर्बळ कसा ?

**प्र. ४ – खालील मुद्यावरून गोष्ट लिहा :** १०

गरीब शेतकरी --- अहोरात्र कष्ट --- पिकासाठी कर्ज --- दुष्काळ --- नुकसान --- बैलजोडी मरते --- चोहोबाजूंनी संकटे --- आत्महत्येचे विचार --- आत्महत्येचा प्रयत्न --- मित्र भेटतो --- सरकारी सोयी सवलतीची माहिती देतो --- सवलतीच्या बळावर जोमाने कष्ट --- यश प्राप्ती --- मित्राचे आभार --- सारांश.

## SECTION - C (COMPREHENSION)

**प्र. ५ – खालील उतारा वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा :**

अनेक व्यवसाय अगदी छोटे असतात आणि छोटेच राहणे अपरिहार्य आहे. मात्र त्यापैकी काहीतून मोठे धंदे सुरू होणं शक्य आहे. जेवणाचे डबे तयार करणाऱ्या दोन–तीन स्त्रियांनी स्वतःची उपहारगृहे सुरू केल्याचे मला माहीत आहे. सौंदर्यप्रसाधनाचा धंदाही बराच मोठा होऊ शकतो. प्रवास कंपन्या आणि

घरबांधणीच्या धंदा तर खूपच मोठं स्वरूप धारण करू शकतो. जाहिरात आणि प्रसिद्धी करण्याचा छोटासा व्यवसाय सुरू करून तो बराच मोठा करणारी मराठी मंडळी मला माहीत आहेत आणि खरा जो कर्तबगार मनुष्य आहे तो तर अणूतून ब्रह्मांड निर्माण करू शकतो. मोटारीची दुरुस्ती करताकरता आबासाहेब गरवारे कुठल्या कुठे जाऊन पोहोचले ते आपण सर्वांनीच पाहिले आहे. पण त्यापैकी अनेक व्यवसाय जरी लहान राहिले तरी धंदा करण्यासाठी लागणाऱ्या मनोवृत्तीचा आणि गुणांचा विकास त्यामुळे होतो आणि स्वतंत्र धंदे करण्यास अनुकूल असं वातावरण त्यातून निर्माण होतं ही गोष्ट महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातल्या उद्योजकतेचा विकास होण्यासाठी हे वातावरण निर्माण होणे अत्यंत महत्वाचे आहे.

**अ) पुढील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा :** **४**

१) उपहारगृहे कोणी सुरू केली ?

अ) कर्तबगार मनुष्याने    ब) आबासाहेबांनी

क) दोन तीन पुरुषांनी    ड) वरीलपैकी कोणतेही नाही

२) खरा कर्तबगार मनुष्य काय करू शकतो ?

अ) डबे तयार करू शकतो.    ब) घर बांधू शकतो.

क) अणूतून ब्रह्मांड निर्माण करू शकतो.

**ब) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** **६**

१) कोण कोणता धंदा मोठा होऊ शकतो ?

२) स्वतंत्र धंदे करण्यास अनुकूल वातावरण कसं निर्माण होतं ?

## SECTION - D (LITERATURE)

**प्र. ६ – पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :** **१५**

१) लहानपणी गुलजार आणि त्यांचे मित्र कोणकोणते खेळ खेळत ?

२) आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती ?

३) घराकडे पाहून ज्योत्स्ना कदम यांना उदास का वाटू लागले ?

४) सावित्रीबाई फुले यांची राहणी कशी होती ?

**प्र. ७ – अ) साध्या सत्यासाठी काय देता यावे ?** **२**

१) पाषाणाची मुले    २) भक्तिभावनेची माती

३) पंचप्राण    ४) आकाश

**ब) पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :** **३**

१) अंधार पखाली या कवितेत कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे ?

२) श्रमिकांनी काय करावे असे कवीला वाटते ? का ?

**क) पुढीलपैकी कोणत्याही दोन अवतरणांचा संदर्भ देऊन त्यातील अर्थसौंदर्य स्पष्ट करा :** **१०**

१) 'ज्योत ज्योतीने जागवा प्रकाश सोहळा
इवल्याशा पणतीने होई काळोख पांगळा'

२) घाम गाळण्याचा असा
गड्या, तुझा माझा वसा

३) मना मनांत उरावा फक्त प्रेमाचा सुवास

**प्र. ८ –** अ) 'या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या कुटुंबीय आहेत' असे प्रीतम का म्हणाला ? **६**

ब) गणपा रावसाहेबाकडे कशासाठी आला होता ? **४**